नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०२/२०२५ (सोमवार) दुपार**

## खुन करणाऱ्या आरोपीला अटक

पोस्टे कन्हान :—**पोलीस स्टेशन कन्हान** अंतर्गत दिनांक १५/०२/२५ चे २३/०० ते १६/०२/२५ चे ०८/३० वा दरम्यान खदान नं ०६ टेकाडी कन्हान ता पारशिवनी येथे मृतक ग.भा मनोरमा जगन शेन्डे, वय ६० वर्ष ,रा. खदान नंबर ०६ टेकाडी यांना **यातील आरोपी रितेश उर्फ सोनू जगन शेन्डे, वय ३२ वर्ष,** रा. खदान नं ०६ टेकाडी कन्हान ता पारशिवनी **याने तुझ्या मुळे माझी बायको पळाली मला माझी बायको आणुन दे असे म्हणुन लाथा बुक्यांनी मारहाण करून मृतक हीला जखमी करून** जिवानिशी ठार मारले. नमूद आरोपी हा नात्याने मृतकाचा मुलगा आहे. सदर प्रकरणी फिर्यादी सौ.रिकु मुकेश मेश्राम वय ३५ वर्ष रा. प्रगमी नगर सुपरटाऊन कन्हान यांचे रीपोर्ट वरून आरोपीविरूद्ध कलम १०३(१) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला असुन **आरोपी रितेश उर्फ सोनू जगन शेन्डे वय ३२ वर्ष,** रा. खदान नं ०६ टेकाडी कन्हान ता पारशिवनी याला पोलीसांनी अटक केली आहे.

## घरफोडी चे २ गुन्हे उघड, १ आरोपी अटक

## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

पोलीस स्टेशन कन्हान :— १) दिनांक ०४/०२/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कन्हान येथे सतीश फिर्यादी ओंकारेश्वर येरपुडे वय ४० वर्ष रा. नरहरी गहु, हिवरा रोड पानतावने कॉलेज कांद्री कन्हान ता. पारशिवनी यांच्या रिपोर्ट वरून सोने चांदी दागिने आणि रोख रक्कम अज्ञात चोराने चोरून नेल्याबाबत घरफोडी चा गुन्हा नोंद आहे. २) दिनांक ०६/०२/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कन्हान येथे कु माधुरी धनराज संतापे, वय ३४ वर्ष रा. खदान क्र ३ कन्हान ता पारशिवनी यांच्या रिपोर्ट वरून सोने चांदी दागिने आणि रोख रक्कम अज्ञात चोराने चोरून नेल्याबाबत घरफोडी चा गुन्हा नोंद आहे.

सदर दोन गुन्हयाचा तपास कन्हान पोलीस करत असुन समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक पध्दतीने आणि गुप्तबातमीदाराच्या मार्फतीने आरोपी प्रज्वल उर्फ पज्जू प्रमोद भगत, वय २० वर्षे, रा. म्हाडा कॉलनी, कपिल नगर नागपूर याला ताब्यात घेवुन विचारपुर केली. आरोपीने त्याच्या तीन साथीदारासह कन्हान पोलीस स्टेशन हद्दीतील वर नमुद २ घरफोडी केल्याबाबत माहीती दिली. आरोपीच्या ताब्यातुन १०,५००/— रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. अरोपीला कन्हान पोलीसांनी अटक केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर